**रे.दि.अपील क्र.२२१/२०१४**

CNR - MHST01-002251-2014

**निशाणी क्र.२७ खालील आदेश**

(हणमंत गणपत चव्हाण विरुध्द श्रीमती जगुबाई लक्ष्मण शिर्के व इतर)

रिस्पॉन्डंट क्र.४ मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.२७ वरील अर्ज व त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. रिस्पॉन्डंटतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंटतर्फे कथन की, रिस्पॉन्डंट क्र.४ हे दिनांक २९/०५/२०१८ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे असलेले वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे. रिस्पॉडंटतर्फे आक्षेप घेतला.

४) अपेलंटतर्फे कथनाप्रमाणे रिस्पॉन्डंट क्र.४ मयत झाल्याने त्यांचे अर्जात नमुद केलेले वारस रेकॉर्डवर घेणेची विनंती केली आहे. रिस्पॉन्डंटतर्फे आक्षेप घेतला आहे. रिस्पॉन्डंट क्र.४ यांचेविरुध्दचा अबेटमेंट आदेश रद्द करणेत आला असुन वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफ करण्यात आला आहे. प्रकरणात दाखल केलेल्या मृत्यू प्रमाणपत्रावरुन रिस्पॉन्डंट क्र.४ रविंद्र लक्ष्मण शिर्के हे दिनांक २९/०५/२०१८ रोजी किडगांव, तालुका व जिल्हा सातारा येथे मयत झाल्याचे दिसुन येते. सबब, मयत रिस्पॉन्डंट क्र.४ यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी देणे योग्य होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) अर्ज (निशाणी क्र.२७) मंजुर करणेत येतो.

(२) मयत रिस्पॉन्डंट क्र.४ रविंद्र लक्ष्मण शिर्के यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस सामिल करण्यास परवानगी देणेत येते.

(३) सदरची दुरुस्ती मुदतीत करावी.

सातारा. (नि.ह. जाधव)

दिनांक – ०५/०१/२०२४. जिल्हा न्यायाधीश–४, सातारा